# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

---

जळगाव दि. ०६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिक्षेत्रातून एम.एस्सी.(प्राणीशास्त्र) या अभ्यासक्रमात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस 'डॉ. निसार जी.पटेल' यांच्या स्मरणार्थ सुवर्णपदक प्रदान करण्यासाठी श्रीमती रेहाना निसार पटेल यांनी दोन लाख रूपयांचा धनादेश कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्याकडे सुपूर्द केला. या शिवाय विद्यापीठातून जैवशास्त्र प्रशाळेतील होतकरू विद्यार्थ्यास डॉ. पटेल यांच्या नावे स्कॉलरशिप देण्यासाठी दोन लाख रूपयांची ठेव देखील जमा केली आहे.

श्रीमती रेहाना पटेल यांनी एम.एस्सी. (प्राणीशास्त्र) या अभ्यासक्रमात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. निसार पटेल या नावाने सुवर्णपदक जाहीर केले असून या सुवर्णपदकासाठीचा दोन लाख रूपयांचा धनादेश आणि डॉ. निसार पटेल सुवर्णपदक या नावाने विद्यापीठातील जैवशास्त्र प्रशाळेतील होतकरू व गरीब विद्यार्थ्यास दोन लाख रूपयांच्या ठेवीच्या व्याजेवरील रक्कम शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात यावी यासाठी देखील दोन लाख रूपयांचा धनादेश विद्यापीठाकडे दिला. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, जैवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. अरूण इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, रेहाना पटेल, अयाज पटेल, शकीला पटेल, प्रा. धनंजय गुजराथी उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ६ सप्टेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी